# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


**परिपत्रक**

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ ३८६०

दिनांक : 19 AUG 2017

विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एस.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रिभूत पव्रेश प्रक्रियेमार्फत अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे विनाअनुदानित संस्थेतील संस्थास्तरावर रिर्पोटिंग न झाल्याने एक अंतिम संधी देणेबाबत...

संदर्भ:- या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक १०/एडीएम/पदविका/२०१७/३८५४ दि. १६.०८.२०१७.

उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एस.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तिस-या फेरीपर्यंत अलॉट झालेल्या भरपुर उमेदवारांचे प्रवेश अद्यापपर्यंत काही विनाअनुदानीत संस्थांनी संस्थास्तरावर रिर्पोटिंग करुन घेतले नसल्याने संबंधित सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत मुळ अर्ज/कागदपत्रांची पडताळणी करुन प्रवेश कर्न्फम करण्याची कार्यवाही **ऐवजी** संबंधित अलॉटमेंट झालेल्या संस्थेमार्फत विहित कालावधीत कार्यवाही करण्यासाठी व तदअनुषंगाने इतर कामे करण्यासाठी या संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे. त्यासाठी संबंधित विनाअनुदानित संस्थेस प्रवेश कर्न्फम करण्याची लिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे, यांची संबंधितांनी नोद घेण्यात यावी.

तसेच संदर्भिय परिपत्रकात वरील परिच्छेदात नमुद कार्यवाही वगळता उर्वरित कार्यवाहीमध्ये बदल करण्यात आला नाही.

(**चंद्रशेखर ओक**) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.,मुंबई

प्रत: मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रतिलिपी: १. कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमूद केल्याप्रमाणे सदर सूचना विदयार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेचा अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपुर यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

३. संबंधित प्राचार्य, सर्व विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी संस्थांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.

C:\Users\desk10\Desktop\extension for admission confirmation to all courses.docx

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk10@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक

क्रमांक: 10/एडीएम/पदविका/2017/ 3854

दिनांक : 16 AUG 2017

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एस.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत अलॉटमेंट झालेल्या विद्यार्थ्यांचे विनाअनुदानित संस्थेतील संस्थास्तरावर रिपोर्टिंग न झाल्याने एक अंतिम संधी देणेबाबत...**

संदर्भ:- या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक १०/एडीएम/पदविका/२०१७/५८२७ दि. ०९.०८.२०१७.

उपरोक्त संदर्भाधिन परिपत्रकाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मधील पोस्ट एस.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रमातील केंद्रीभूत प्रवेश फेरीच्या तिसऱ्या फेरीपर्यंत अलॉट झालेले प्रवेश अद्यापपर्यंत काही विनाअनुदानित संस्थांनी संस्थास्तरावर रिपोर्टिंग केले नसल्याने सदर विद्यार्थ्यांचे प्रवेश कन्फर्म करण्यासंदर्भात विनंती पत्र या संचालनालयास प्राप्त झाले आहेत.

त्याअनुषंगाने कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी काही कारणास्तव प्रवेश निश्चिती केंद्रावर (ARC) जाऊनही प्रत्यक्ष संस्थेत जाऊन निश्चित करु शकले नाहीत किंवा एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करु शकले नाहीत असे विद्यार्थी हे केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील असल्याने सदर विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन विनाअनुदानित संस्थेतील संस्थास्तरावर रिपोर्टिंग करणेबाबत एक अंतिम संधी म्हणून संबंधित संस्थेने संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाकडे दि. १८.०८.२०१७ ते २२.०८.२०१७ पर्यंत प्रस्ताव सादर केल्यानंतर सदर कालावधीत विभागीय कार्यालयांनी (रविवार सुट्टीत विभागीय कार्यालय चालु ठेवुन) खाली नमुद केल्याप्रमाणे पुढील कार्यवाही करुन संस्थास्तरावरील रिपोर्टिंग करुन घेण्यासाठी या संचालनालयाची मान्यता देण्यात येत आहे. सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी सदर प्रक्रिया अतिशय काळजीपूर्वक पार पाडावी.

- केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेतील अंतिम (Latest) अलॉटमेंटनुसार (Seat Type उपलब्ध असल्यास) त्याच विनाअनुदानित संस्थेत विद्यार्थी प्रवेश घेण्यास इच्छुक असल्यास, विद्यार्थ्यांना त्याच विनाअनुदानित संस्थेत प्रवेश घेण्यास इच्छुक असल्याचा मुळ अर्ज व आवश्यक त्या मुळ कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतर संस्थास्तरावर रिपोर्टिंग करुन घेण्यात यावे.

- तसेच वरीलपैकी ज्या उमेदवारांनी एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेतही प्रवेश निश्चित करु शकले नाहीत अशा उमेदवारांचे संस्थेमार्फत प्रति विद्यार्थी रु. १०००/- (रु. एक हजार फक्त) शुल्क आकारुन आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचे नावे (विद्यार्थ्यांच्या Excel मधील इत्यंभूत माहितीची यादीसह) त्यांचा एकत्रित धनाकर्ष (डी.डी.) आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा कक्ष यांचेकडे विभागीय कार्यालय पाठवतील व त्याची योग्य ती नोंद संबंधित सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी ठेवावी

- सदर प्रवेश over and above होणार नाही, यांची दक्षता संबंधित सर्व तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांनी घ्यावी.

- अशा प्रकारचे केलेले प्रवेश केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत केलेले आहेत असे समजुन सदर विद्यार्थ्यांना केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेचे लाभ लागु राहतील.

- अशा प्रकारे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत विनाअनुदानित संस्थेत अलोटमेन्ट झालेल्या उमेदवाराचे प्रवेश निश्चित करण्यासाठी एक अंतिम संधी म्हणून दि. १९.०८.२०१७ ते २२.०८.२०१७ पर्यंत देण्यात आली असल्याने सदर संधी कोणत्याही कारणास्तव गमावल्यास विद्यार्थी/पालक व संस्था यांना पुनश्च: कोणत्याही सबबीखाली अशी संधी मिळणार नाही.

तसेच वर नमुद बाब वगळून येथे असे ही कळविण्यात येते की, या संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक १०/एडीएम/पदविका/२०१७/३८३० दि. १०.०८.२०१७ मधील मुद्दा क्रमांक ३ मध्ये नमुद केल्यानुसार विद्यार्थी जर पहिल्या अलॉटमेंट झालेल्या विनाअनुदानित संस्थेत जाऊन तेथे Seat Type उपलब्ध असल्यास संस्थेने विद्यार्थ्यास सदर रिक्त जागेवर प्रवेश दिला असून त्याप्रमाणे Admission Portal मधून संस्थेच्या Login मधून मेसेज करून मेसेज बॉक्सद्वारे संचालनालयास Admin यांना मेसेज केला आहे परंतु अद्यापपर्यंत अशा विद्यार्थ्यांचे ऑनलाईन प्रवेश या संचालनालयाकडून कन्फर्म करण्यात आले नाहीत अशा विद्यार्थ्यांची सविस्तर माहिती Excel मध्ये (विद्यार्थ्यांच्या आवश्यक त्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीसह) संबंधित संस्थेने विभागीय कार्यालयामार्फत hardcopy व ईमेलद्वारे या संचालनालयास दि. २२.०८.२०१७ पर्यंत सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत सादर करण्यात यावी. जेणेकरुन प्रस्तुत प्रकरणात पुढील योग्य ती कार्यवाही तात्काळ करण्यात येईल.

(चंद्रशेखर ओक) भा.प्र.से.
संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

प्रत: मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीस्तव सादर

प्रतिलिपी: १ कार्यासन अधिकारी, आय.टी. सेल, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, वर नमुद केल्याप्रमाणे सदर सूचना विद्यार्थी व पालकांच्या माहितीकरीता संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात याव्यात व प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने आवश्यक कार्यवाही तात्काळ करावी.

२. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर यांना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना. प्रस्तुत प्रकरणात कळविण्यात येते की, ज्या उमेदवारांनी एआरसी केंद्रावर प्रवेश निश्चित केलेले नाहीत त्यामुळे संस्थेनेही प्रवेश निश्चित करु शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांची Excel मधील इत्यंभूत माहितीची यादी या संचालनालयास मुख्य सादर करण्यात यावी.

३. संबंधित प्राचार्य, सर्व विनाअनुदानित पदविका अभियांत्रिकी संस्थाना माहिती व पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना.